# सृजनरंग

अंक - ९

एप्रिल २०२५



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष : सृजनरंग : अंक - ९


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन.
- **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल,** (भा.प्र.से.)
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा. सचिन्द्र प्रताप सिंह,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक** : **मा. राहूल रेखावार,** (भा.प्र.से.)
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक** : **मा. अनुराधा ओक,**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **मा. डॉ. माधुरी सावरकर,**
  उपसंचालक, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. दिपक माळी,**
  उपविभाग प्रमुख, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. अजयकुमार फुंदे,**
  अधिव्याख्याता, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती समन्वयक** : **सुनीता काटम,**
  विषय सहायक, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष.
- **तज्ज्ञ समिती** : **डॉ. संदीप पवार,**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सिंधुदुर्ग.
  **राणी पाटील**
  अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर.
  **संदीप वाकचौरे,**
  उपशिक्षक, जि. प. प्राथ. शाळा कोंची, ता. संगमनेर, जि. अहमदनगर तथा राज्य अभ्यासगट सदस्य.
  **सुवर्णा पवार,**
  उपशिक्षिका, जि. प. प्राथ. शाळा आर्वी, ता. हवेली, जि. पुणे तथा राज्य अभ्यासगट सदस्य, गणित.
  **वैशाली शेवाळे,**
  विषय साधनव्यक्ती URC, औंध मनपा.
  **पूजा जाधव,**
  उपशिक्षिका, जि. प. प्राथमिक शाळा गिरीम, ता. दौंड, जि. पुणे.
- **मुखपृष्ठ रचना** : **नीताली हरगुडे** (कला शिक्षिका, सरिता विद्यालय, पुणे.)
- **मलपृष्ठ रचना** : **विवेकानंद पाटील** (कलासाम्राज्यम्, पुणे.)
- **अंक ९** : एप्रिल, २०२५
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.

# सृजनरंग

अंक - ९

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# प्रस्तावना

**शिक्षक बंधुभगिनींनो,**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने सृजनरंगचे नववे त्रैमासिक आपल्या हातात देताना मनस्वी आनंद होत आहे. गेल्या काही अंकांमध्ये शाळा स्तरावर सुरू असलेल्या विविध विषयांच्या अनुषंगाने उपक्रमांची मांडणी करण्यात आली आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून अनेक शाळांना प्रेरणा मिळाली आहे. हा अंकही आपल्या हातात देताना अशाच भावना आहेत.

शिक्षण म्हणजे नेमके काय? असा प्रश्न विचारला गेला, तर त्याची उत्तरे भिन्न स्वरूपात येत असतात. मात्र शिक्षणाचा मूलभूत अर्थ 'जीवन शिक्षण' असाच होतो. जीवन शिक्षणचा अर्थ जीवनातील आपल्या गरजांची परिपूर्ती करणारी सर्व प्रकारची कौशल्य प्राप्त करण्याची व्यवस्था. माणसाच्या मूलभूत तीन गरजा आहेत. अन्न, वस्त्र आणि निवारा या तीनही गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारी कौशल्य शिक्षणातून प्राप्त करून देण्याची गरज आहे. त्यामुळे त्या दृष्टीने काही प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. 'परसबाग' हा जीवन शिक्षणचा एक महत्त्वाचा भाग आहे. शेती ही भारतीय विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे. शेतीच्या माध्यमातून आपण माणसांची पोटाची भूक क्षमवू शकतो. त्याचबरोबर माणसांच्या वस्त्रविषयक गरज पूर्ण करू शकतो. आपल्याला शिक्षणातून बौद्धिक विकासाची प्रक्रिया अपेक्षित आहे, मात्र ती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी उत्तम आहाराची आवश्यकता आहे. तो आहार शेतीतून निर्माण केला जात असतो. आहार उत्तम असेल, तर कुपोषण टाळता येते. कुपोषण टाळले गेले, तर बौद्धिक विकासाकडे झेप घेता येते. ही एकमेकांत गुंतलेली वीण आहे. त्यामुळे परसबागेच्या माध्यमातून आपण केवळ शालेय पोषण आहार उत्तम दर्जाचा करत असतो असे नाही, तर त्या पलीकडे विद्यार्थ्यांच्या हातात जीवनविषयक कौशल्यांची वृद्धी करत असतो आणि अपेक्षित असलेल्या बौद्धिक विकासासाठी त्या माध्यमातून प्रवास घडवत असतो. त्यामुळे शासन आदेश आहे म्हणून परसबाग निर्माण करणे अपेक्षित नाही. ही प्रत्येक गोष्ट विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी असते हे लक्षात घ्यायला हवे. चार भिंतीच्या आत घडते ते शिक्षण, असे नाही, तर चार भिंतीच्या पलीकडे उघड्या आकाशात अवतीभोवती जे काही म्हणून आहे त्या सर्व गोष्टी शिक्षणप्रक्रियेचा भाग आहेत हे लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे परसबागेच्या निमित्ताने शाळा सुंदर होतील, दिसतील. विद्यार्थ्यांमध्ये श्रमाचे कौशल्य, श्रमाचे मूल्य रुजवण्यासाठी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणून त्याकडे पाहायला हवे. मूल्य सांगून रुजत नसतात, तर त्यासाठी मूल्य प्रत्यक्षात अनुभवातून रुजवायची असतात. या निमित्ताने मूल्यांचा विचार विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रत्यक्ष प्रतिबिंबित होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षण अधिक सक्रिय आणि गतिमान होण्यास मदत झाली असेल असा मला विश्वास वाटतो. या अंकामध्ये ज्या शिक्षकांनी, शाळांनी परसबागेच्या उपक्रमाची वाट चालणे पसंत केले आहे. त्यांच्या अनुभवांची मांडणी करण्यात आली आहे. परसबागेविषयीचे सर्व लेख तुम्हा सर्वांना आवडतील असा विश्वास वाटतो.


**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**

**संचालक**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


◈ **शेती शिक्षणाची आरोग्यमय वाट** १
जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा पाथरवाला (बु.), ता. अंबड, जि. जालना.

◈ **औषधी वनस्पतींची परसबाग** ४
जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा, असगणी नं. २, ता. खेड, जि. रत्नागिरी.

◈ **मातीशी नाते जोडणारी वाट** ७
रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा तळाशेत, ता. माणगाव, जि. रायगड.

◈ **फळाफुलांनी फुलली बाग** ९
आदर्श मॉडेल स्कूल विद्यामंदिर, शिवनाकवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

◈ **वृक्षसंस्काराची नवी वाट** १५
जिल्हा परिषद, वरिष्ठ प्राथमिक आदर्श शाळा, सावली पंचायत समिती, देवरी, जि. गोंदिया.

◈ **नव्या बदलाच्या दिशेने** १८
डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत, जि. प. उच्च प्राथमिक आदर्श शाळा, पुनर्वसन क्र. ४, ता. तळोदा, जि. नंदुरबार.

◈ **परसबाग निर्मितीच्या दिशेने** २१
रायगड जिल्हा परिषद, आदर्श शाळा मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड.

◈ **उपक्रमातून जीवन विकास** २५
जिल्हा परिषद, मराठी उच्च प्राथमिक शाळा वरखेड, ता. चिखली, जि. बुलढाणा.

◈ **जीवन शिक्षणाच्या वाटेने** ३०
जिल्हा परिषद राज्य मॉडेल स्कूल, विजयनगर, म्हैसाळ, ता. मिरज, जि. सांगली.

# शेती शिक्षणाची आरोग्यमय वाट

शाळेलगत असलेल्या मोकळ्या जागेवर सांडपाणी, कंपोस्ट खत यांवर आधारित उपयुक्त भाजीपाल्यांची बाग म्हणजे, 'परसबाग.' शालेय परसबाग तयार करताना आपला हेतू असतो की, आपल्या रोजच्या खाण्यामध्ये आवश्यक असलेला भाजीपाला पिकवणे. यात कमीत कमी जागेत जास्तीत जास्त प्रकारच्या भाज्या कशा घेता येतील, हा विचार करून जागेचे नियोजन केले गेले. शाळेतील विद्यार्थ्यांना भाजी पिकवण्याची माहीती व्हावी, या हेतूने आम्ही आमच्या शाळेत परसबाग तयार केली. शेती व पर्यावरण या विषयी विद्यार्थ्यांना अनुभवांतून ज्ञान मिळावे, हा त्या मागचा प्रमुख उद्देश होता.

आमच्या शाळेचा परिसर मोठा आहे. शाळेमध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत वर्ग असून, जवळजवळ २७५ विद्यार्थी या ठिकाणी दर्जेदार शिक्षण घेत आहेत. वर्गखोल्या व कार्यालय सोडून क्रीडा मैदान, फुलांची बागही तयार केलेली आहे. फुलांच्या बागेशेजारीच करंजीची झाडे लावलेली आहेत. त्या करंजीच्या झाडांमध्ये शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी मिळून एक शालेय परसबाग तयार करण्याचे नियोजन केले. त्यामुळे शाळेची परसबाग करण्यासाठी खालील टप्प्यांमध्ये आम्ही काम सुरू केले.

१) **जागेची निवड :** शाळेच्या आवारातील रिकाम्या व वापरात नसलेल्या जागेचा वापर परसबागेसाठी करण्यात आला. तेथील गवत, बाभळी काढून टाकण्यात आल्या. कुदळ, टिकाव यांनी जमीन भुसभुशीत करण्यात आली. हे काम विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या आवडीने केले.

२) **मातीचा पोत सुधारणे :** शाळेतील व परिसरातील गवत काढून, तसेच प्लॅस्टिक वेगळे करून शिल्लक केरकचरा, पालापाचोळा, एखादे वेळी शिल्लक राहिलेला भात, मुलांच्या डब्यांतील शिल्लक राहिलेले अन्न हे सर्व एका खड्ड्यात टाकून त्यांत पाणी मिसळले. त्यापासून उच्च दर्जाचे कंपोस्ट खत तयार झाले. या पालापाचोळ्यापासून, गवतापासून बनवलेल्या जैविक, नैसर्गिक खतांमुळे माती सुपीक बनली.

३) **बियाणे व रोपांची निवड :** स्थानिक हवामानाला, जमिनीला अनुरूप असलेल्या पालेभाज्या, फळभाज्या लावण्यात आल्या. त्यामध्ये पानकोबी, फ्लॉवर, मिरची, टोमॅटो, वांगी, पालक, कोथिंबीर, मेथी, चुका यांसारख्या भाज्या लावण्यात आल्या.

४) **पाणी व्यवस्थापन :** ठिबक सिंचन, पाण्याचा पुनर्वापर या तंत्राचा उपयोग करून पाण्याचे नियोजन करण्यात आले होते. या कामासाठी शाळेतील विद्यार्थ्यांचे गट करून आपली परसबाग ही संकल्पना राबवली.

५) **विद्यार्थी सहभाग :** बी, रोपे लावणे, पाणी घालणे, खुरपणी, तोडणी यांसारखी कामे विद्यार्थ्यांनी मनापासून केली. वेगवेगळ्या रोपांची जबाबदारी देऊन मुलांना यात सहभागी करून घेण्यात आले. अनेक मुलांनी खुरपणी, लावणी, तोडणी यांसारखी कौशल्ये शिकून घेतली.

**परसबागेचा उपयोग कसा केला जातो :**

१) **शिक्षणासाठी :** विद्यार्थ्यांना सेंद्रिय खतनिर्मिती, कंपोस्ट खतनिर्मिती कशी होते? बीज लावणी, उगवण, वनस्पतींची वाढ, मातीचे प्रकार, सिंचन, शेतीचे प्रकार, पर्यावरण संरक्षण तसेच पडीक जमिनीचा उपयोग कसा करावा, या सर्व बाबी प्रत्यक्ष निरीक्षण, कृती, प्रात्यक्षिक यांद्वारे विद्यार्थ्यांना शिकता आल्या.



२) **पौष्टिक आहारासाठी :** शाळेमध्ये स्वतः विद्यार्थ्यांनी पिकवलेली भाजी शाळेच्या स्वयंपाकघरात वापरली गेली. त्यामुळे विद्यार्थ्यांना ताजा, नैसर्गिक पद्धतीने पिकवलेला, कीटकनाशकांचा वापर न केलेला असा सेंद्रिय भाजीपाला खायला मिळाला.

३) **वैज्ञानिक प्रयोगांसाठी :** विद्यार्थ्यांनी खतनिर्मिती, पाण्याचा पुनर्वापर, कीड नियंत्रण यांवर विविध प्रयोग केले. त्यामुळे अनुभवांतून त्यांना ज्ञान मिळाले. तसेच मूळ, खोड, पान, फूल, बी हे वर्गामध्ये वेगळे शिकवण्याची गरज पडली नाही. या सर्व बाबी ते कृतीतून, स्वानुभवांतून शिकले. मी ऐकले, मी विसरलो, मी केले, मला सर्व समजले या ओळींप्रमाणे विद्यार्थी स्वतः प्रयोग करून शिकू लागले व ते त्यांत यशस्वी झाले.

४) **शाळेचे सौंदर्य वाढवण्यासाठी :** शालेय परसबागेमुळे शाळेचे वातावरण हिरवेगार व प्रसन्न राहते. शाळेच्या रूपामध्ये नैसर्गिकपणा येतो. मुलांना शाळेच्या प्रसन्न वातावरणात करमते. थोडक्यात सांगायचे तर शाळेचे सौंदर्य परसबागेमुळे वाढले.

५) **निसर्गप्रेम वाढवण्यासाठी :** विद्यार्थ्यांना बिया, रोपे, त्यांना पाणी घालणे, पाण्याचा पुनर्वापर करणे, मधमाशा, फुलपाखरे, भुंगे, एकंदर पर्यावरणातील विविध घटक व त्यांचे महत्त्व त्यांना प्रत्यक्ष समजले. विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम वाढवणे, रुजवणे यासाठी ही परसबाग अत्यंत मोलाची ठरली.

६) **शाळेसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ :** शालेय परसबागेमुळे विद्यार्थ्यांत निसर्गाविषयी प्रेम, जबाबदारीची व कर्तव्याची जाणीव झाली. विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीची आवड निर्माण झाली. विद्यार्थी, शिक्षक, पालक व गावकऱ्यांनी परसबाग पाहायला येऊन सहकार्य केले. सर्वांसाठी परसबाग ही प्रेरणेचा दीपस्तंभ बनली. जगात कुठलीच गोष्ट फुकट मिळत नाही. त्यासाठी कष्ट हे करावेच लागतात. स्वतःला खपवून घ्यावे लागते. बिजाप्रमाणे वागून मुलांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शालेय परसबाग संदररीत्या फुलवली.

**श्री. श्रीकृष्ण उबाळे**

जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा

पाथरवाला (बु.), ता. अंबड, जि. जालना

# औषधी वनस्पतींची परसबाग

*पालक हिरवीगार छान! घेऊ आपण पोषक आहार*
*चला मुलांनो परसबागेत, सुंदर फुलांसवे करू विहार!*
*वेचूया कांदा-मुळा, भाजी, फुलपाखरांची बघू या रांग!*
*चला विद्यार्थ्यांनो फुलवू, शाळेत नावीन्यपूर्ण परसबाग!*

'परसबाग' म्हटले की, हवेशीर मोकळी जागा आणि त्यांत विविध फुलांनी, पालेभाज्यांनी फुललेली हिरवीगार बाग आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. शाळेलगतच मोकळ्या जागेवर आणि सांडपाण्यावर आधारित उपयुक्त भाजीपाल्यांची बाग म्हणजेच 'परसबाग.' ही 'परसबाग' तयार करण्याचा मुख्य हेतू म्हणजे शाळेतील विद्यार्थ्यांना पोषक आणि आवडीच्या पालेभाज्या खाता याव्यात, तसेच 'नावीन्यपूर्ण परसबाग' ही शाळेच्या परिसरातच तयार केलेली आहे. सुंदर अशा पालेभाज्यांनी व विविध फुलांनी सजलेली आमच्या शाळेतील ही नाजूक फुलांची; म्हणजेच शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वहस्ते केलेली ही एक 'नावीन्यपूर्ण परसबाग' होय. रोज विद्यार्थी शाळेत आल्यावर अर्धा तास कार्यानुभवचा तास म्हणून परसबागेत श्रमदान करतात. विद्यार्थ्यांच्या श्रमदानाने ही 'नावीन्यपूर्ण परसबाग' अधिकच आनंदाने बहरलेली आहे. हिरव्यागार, ताज्या व टवटवीत भाज्यांचे दर्शन सर्वांनाच सुखावते. आमचा सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी रोज या सुंदर परसबागेची देखभाल करतात. सर्व जण आनंदाने या कामाला हातभार लावतात.



आमच्या शाळेतील ही परसबाग देखणी आणि नावीन्यपूर्ण कशी? तर, शाळेमध्ये मैदानावर पडलेला पालापाचोळा, बाजारातून आणलेल्या भाजीपाल्याचे देठ, परिसरातील केरकचरा यांची विल्हेवाट कशी लावायची, हा मोठा प्रश्न आमच्या शाळेसमोर होता. म्हणून मग आम्ही शाळेलगतच एक शोषखड्डा



तयार केला व त्यांत जमलेला कचरा टाकून कंपोस्ट खत तयार केले. आमचे विद्यार्थी परिसरातून शेण आणतात व ते मातीत मिक्स करून वाफे तयार करतात. त्यामध्ये शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी रोपांची लागवड करतात. त्यामध्ये टोमॅटो, मिरची, वांगी, भेंडी, गवार, दुधी, पालक, भोपळा, कोथिंबीर इत्यादी बी–बियाणांची लागवड केली जाते. या विविध प्रकारच्या भाज्या व पालेभाज्या सुद्धा आम्ही आमच्या या परसबागेत पिकवतो. त्याचा उपयोग आम्हाला मधल्या सुट्टीतील पोषण आहार म्हणून विद्यार्थ्यांना जेवणात दिला जातो. विद्यार्थी सुद्धा आनंदाने, स्वमेहनतीचे फळ म्हणून पालेभाज्या आवडीने खातात. आहार घेत असताना त्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद असतो. हा भाजीपाला रसायनविरहित असल्यामुळे शरीराला पोषक ठरतो. तसेच हा भाजीपाला स्वतःच्या हाताने पिकवला असल्यामुळे सर्वांनाच आत्मसमाधान लाभते. त्यातूनच परसबाग ही नैसर्गिकरीत्या कशी करायची? पाणी व खत किती प्रमाणात द्यायचे, परसबागेची निगा कशी राखायची, हे विद्यार्थ्यांना सांगितले.

परसबागेलगतच्या चहुबाजूंनी परिसरात फुलझाडे लावण्यात आली, जसे की, गुलाब, मोगरा, जाई, जुई, यांप्रमाणे अनेक प्रकारची फुलझाडे आहेत. त्या फुलझाडांवर दिवसभर विविध रंगांची, विविध प्रकारची फुलपाखरे येत असतात. फुलपाखरांच्या जीवनशैलीचा अभ्यासही विद्यार्थ्यांना कार्यानुभवाच्या तासाला दिला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना परिसरातून अधिक ज्ञान प्राप्त होते.

आम्ही आमच्या परसबागेत एक आयुर्वेदिक कोपरासुद्धा तयार केला आहे. विद्यार्थी मैदानावर मनोरंजनात्मक खेळ खेळत असताना त्यांना जखम झाली किंवा सर्दी, खोकला यांसारख्या आजारांवर हा औषधी कोपरा आम्हाला उपयुक्त ठरतो. येथे आम्ही वनौषधींची एका कोपऱ्यात लागवड केलेली आहे. त्यात अडुळसा, गवती चहा, तुळस, आले यांसारख्या वनस्पतींची लागवड केली आहे. परिसर अभ्यासाच्या

तासाला मुलांना त्याची माहिती दिली जाते. अशा प्रकारे आमच्या शाळेलगतची ही ‘नावीन्यपूर्ण परसबाग’ आम्ही जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा, असगणी नं २, या शाळेत शिक्षक व विद्यार्थी मिळून फुलविलेली आहे. आम्हा सर्वांनाच परसबागेचा दैनंदिन जीवनात पूर्णपणे उपयोग होतो.

*विविध पालेभाज्यांच्या विश्वात बहरून येते पालक, मेथीचे पान,*

*नावीन्यपूर्ण परसबागेत, रंगीबेरंगी फुलं बहरून येतात छान!*

**प्रवीण पानपाटील,**

जिल्हा परिषद पूर्ण प्राथ. शाळा, असगणी नं. २,

ता. खेड, जि. रत्नागिरी.

# मातीशी नाते जोडणारी वाट

शालेय परसबाग हा शिक्षणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा भाग आहे. विद्यार्थ्यांना पर्यावरणाचा अभ्यास आणि निसर्गाशी जवळीक साधण्याची संधी परसबागेतून मिळत असते. परसबाग ही केवळ शाळेची शोभा वाढवणारी बाब नाही, तर शालेय शिक्षणाच्या उपक्रमाचा एक अभिन्न भाग आहे. शाळेसाठी रोज लागणारा भाजीपाला, विविध वनौषधी सहज शाळेत उपलब्ध होतात, विद्यार्थ्यांमध्ये सांघिक वृत्ती तयार होते, तसेच पर्यावरणाची माहिती, विविध वनौषधींची माहिती मिळते. त्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येतो. सेंद्रिय खतनिर्मिती व त्याचा वापर याची माहिती मिळते. पाणी व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो, तसेच विदयार्थ्यांना शेतीविषयक अनुभव देण्याच्या अनुषंगाने सदर उपक्रम शाळेत राबवण्यात आला. हा उपक्रम शैक्षणिक वर्ष डिसेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत राबवण्यात आला आहे. परसबाग विकसित करत असताना आम्ही विचार केला होता की, यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती निर्माण करणे, शेती व बागकामाचे प्राथमिक ज्ञान देणे. सेंद्रिय शेतीच्या महत्त्वाविषयी समज विकसित करणे. निसर्गाशी प्रेम आणि जबाबदारीची भावना निर्माण करणे. शाळेच्या स्वयंपाकघरासाठी ताजी फळे, भाज्या उपलब्ध करून देणे. विद्यार्थ्यांना आरोग्यामध्ये आहाराचे महत्त्व याची जाणीव करून देणे.

वरीलप्रमाणे उद्दिष्ट निश्चित केल्यानंतर कार्यवाहीच्या दृष्टीने पावले पडू लागली, त्यासाठी सर्वप्रथम मुख्याध्यापक व शिक्षक यांची मीटिंग घेऊन नियोजन करण्यात आले. यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत आदर्श शाळा नोडल अधिकारी यांचे मार्गदर्शन घेतले. त्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये परसबाग संकल्पना, परसबाग महत्त्व याची जाणीव जागृती केली. इयत्तानिहाय वेळापत्रक तयार केले. सर्व विद्यार्थ्यांनी मिळून शाळेच्या भोवतालच्या जागेचे खोदकाम केले व जमीन भुसभुशीत केली.

पालक व विद्यार्थ्यांना भाजीपाला व रोपे लावणे याबाबत योग्य माहिती दिली. पालकांची मदत घेऊन सर्व माहिती मिळवली. जमीन तयार झाल्यावर, वर्गनिहाय वेगवेगळी रोपे, वनौषधी, फुलझाडे तसेच भाजीपाला याची लागवड केली. वर्गनिहाय झाडांना पाणी व निगराणी याचे व्यवस्थापन केले. वर्गातील विद्यार्थ्यांना वर्गनिहाय निगा राखण्याची जबाबदारी दिली.

शाळेभोवताली साचलेल्या झाडांच्या पालापाचोळ्यापासून सेंद्रिय खत तयार केले. त्याचा वापर झाडांसाठी केला. आज शाळेमध्ये दहा प्रकारचा भाजीपाला, विविध वनौषधी, फुले यांची झाडे आहेत. यांचा वापर आम्ही शाळेच्या शालेय पोषण आहारासाठी करत आहोत. विविध औषधींचा वापर विद्यार्थी आजारी पडल्यास उपचारांसाठी होत असतो.

परसबाग विकसित करण्यात आम्हा सर्वांना आनंद मिळतो. या परसबागेचा उपयोग आम्हाला विविध स्वरूपांत होऊ लागला आहे. हा उपयोग होत असताना शाळेला त्याचे निश्चित असे फायदे झाले. परसबाग

विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष शिक्षणाचे उत्तम साधन आहे. विद्यार्थ्यांना निरीक्षण, संशोधन आणि प्रयोग यासाठी चांगले साधन मिळाले. ताज्या भाज्या आणि फळांचे सेवन विद्यार्थ्यांना आरोग्यपूर्ण जीवनासाठी फायदेशीर ठरले आहे. परसबागेसाठी एकत्र काम केल्यामुळे टीमवर्क आणि जबाबदारीची भावना विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व बालवयातच आमच्या शाळेतील मुलांना शिकायला मिळाले. परसबागेतून तयार केलेले उत्पादन विक्रीसाठी वापरून शाळेला आर्थिक फायदा मिळाला. त्यातून शालेय उपक्रमांसाठी मदत झाली. परिसर अभ्यास या पाठ्यपुस्तकातील पर्यावरणासंबंधीचे घटक प्रत्यक्ष या परसबागेच्या माध्यमातून शिकवण्यात आले. परसबाग तयार करून त्यामध्ये विविध भाजीपाला तयार करताना विद्यार्थ्यांच्या मनात शेतीविषयी आवड निर्माण होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांना स्वानुभवातून शिक्षण देता आले याचा आम्हास आनंद झाला. शाळेसाठी परसबाग निर्माण करत असताना शिक्षक म्हणून आमची महत्त्वाची भूमिका राहिली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बागकामाचे योग्य नियोजन करून मार्गदर्शन केले. मुलांना नवनवीन कल्पना सुचवून त्यांचा सहभाग वाढवला. त्यांना वेळोवेळी शेतीचे व परसबागेचे महत्त्व समजून सांगितले.

परसबागेच्या देखभालीसाठी नियमित नियोजन केले. स्वतः शिक्षकांनी सहभाग घेतला. परसबागेतील फळे व भाज्यांचा उपयोग शाळेतील उपक्रमांसाठी कसा करता येईल, यावर भर दिला. त्या पद्धतीने वर्गनिहाय नियोजन करून अध्ययन–अध्यापनामध्ये उपयोग केला.

शालेय परसबाग हा केवळ एक उपक्रम नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी एक सृजनशील साधन आहे. पर्यावरणाचे ज्ञान, जीवनावश्यक कौशल्ये आणि निसर्गाशी मैत्री या गोष्टी शालेय परसबागेतून शिकायला मिळतात. अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा वेळेचा सदुपयोग होतो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येक शाळेत शालेय परसबाग असणे आवश्यक आहे. परसबाग स्पर्धेमध्ये नुकताच आमच्या शाळेला तालुक्यात दुसरा क्रमांक मिळाला व रोख स्वरूपात बक्षीसही मिळाले. त्यामुळे आम्ही आनंदी झालो. परसबाग हे शिक्षणाचे माध्यम बनले. जीवन शिक्षण म्हणजे नेमके काय याचा अनुभव विद्यार्थ्यांना या निमित्ताने घेता आला. शिक्षणाचे नाते मातीशी ठेवले, तर विद्यार्थी अधिक चांगले शिकतात हे या अनुभवातून समोर आले.

**विवेक गोरे,**

रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा

तळाशेत, ता. माणगाव, जि. रायगड

◈◈◈

# फळाफुलांनी फुलली बाग

केंद्रशासनाने प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळांमध्ये परसबाग निर्माण करून उत्पादित भाजीपाला शालेय पोषण आहारामध्ये समाविष्ट केले जातात. त्या अनुषंगाने ग्रामीण व शहरी भागांतील शाळांमध्ये राबवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

परसबागनिर्मितीमुळे विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक निर्माण व्हावी, पोषक आहार मिळावा, सेंद्रिय पालेभाज्यांमुळे त्यांचे आरोग्य सुधारून कुपोषण दूर व्हावे, असे विविध चांगले हेतू या उपक्रमामुळे साध्य होत आहेत.

## शालेय परसबाग संकल्पनेची वैशिष्ट्ये :

### १) मर्यादित जागेचा वापर :

शाळेच्या पूर्वेला पाण्याची टाकी व स्वयंपाकगृह या दरम्यानची थोडीशी जागा होती. या जागेचा वापर परसबागेच्या जागेसाठी करण्याचा संकल्प करण्यात आला. सदरची जागा काही अंशी खडकाळ स्वरूपाची असल्यामुळे परसबागेसाठी थोडी अडचणीची वाटू लागली.

### २) विद्यार्थी/पालक/सामाजिक सहभाग :

परसबागेसाठी सांडपाण्याचा वापर करण्याकरिता हीच जागा उत्तम होती, म्हणून याच जागेवर परसबाग करण्याचे ठरले. यासाठी इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सायंकाळच्या वेळेत कुदळ, पहार यांच्या साहाय्याने  खडकाळ भाग फोडण्याचे काम सुरू केले. श्रमामुळे परसबागेसाठी बऱ्यापैकी जागा निर्माण झाली. याशिवाय शाळा समितीतील सदस्य पालकांनी लक्ष घालून ट्रॅक्टरच्या साहाय्याने जमीन नांगरून दिल्यामुळे बरीचशी माती मोकळी झाली. शाळेच्या मधल्या वेळेत यामधील दगडधोंडे वेचण्याचे काम केले. याशिवाय ग्रामपंचायत व गावातील काही तरुण मंडळींनी परसबागेसाठी माती ओढून द्यायचे बहुमोल सहकार्य केले. यामुळे आलेल्या अडचणींवर मात करत परसबागेची निर्मिती झाली.

### ३) नावीन्यतेस चालना :

१) **परसबागेची निर्मिती :** आमच्या विद्यार्थ्यांना चौकटीबाहेर विचार करायला आणि नवीन मार्ग शोधायला परसबाग खूप फायदेशीर ठरली. माती पोषक असेल तर फळभाजी चांगल्या प्रमाणात पिकते व ती उत्कृष्ट दर्जाची असते, ही धारणा विद्यार्थ्यांनी लक्षात घेऊन आपल्या परिसरातील शेणखत, मळी, खत व सुपीक माती उपलब्ध करून ती परसबागेत पसरायला सुरुवात केली.

### २) विद्यार्थी व पालक सहभाग :

रिकाम्या वेळी व सुट्टीचे दिवशी विद्यार्थ्यांनी घरातून कुदळ, खोरे, खुरपे आणून अनावश्यक वाढलेले गवत व तण काढून परसबागेत भाजीपाला पिकवण्यासाठी योग्य अशी परसबाग निर्माण केली. काही पालकांनी ठिबक सिंचनसाठी पाइप दिले, तर काही पालकांनी छोट्या ट्रॅक्टरच्या साहाय्याने सऱ्या पाडून दिल्या. विद्यार्थी व पालक यांच्या उत्तम सहभागामुळे आमची परसबाग चांगल्या प्रकारे आकार घेऊ लागली.

### ३) नैसर्गिक स्वास्थ्य संवर्धन :

या परसबागेसाठी विद्यार्थ्यांनी आपल्या घरून शेवगा, धने, पालक, मेथी ही बियाणे आणून परसबागेत लावले. काही शेतकरी पालकांनी आपल्या शेतातील कोबी, फ्लॉवर, टोमॅटो, मिरची यांची रोपे देऊ के ली.

सांडपाण्याबरोबरच विद्यार्थी ठिबक सिंचन किंवा झारीच्या साहाय्याने परसबागेला पाणी घालण्याचा आनंद घेऊ लागले. शाळेच्या मधल्या वेळेत विद्यार्थिनींनी परसबागेत जाऊन अनावश्यक आलेले गवत व तण काढून टाकल्यामुळे परत बागेतील भाजीपाला चांगल्या रीतीने फुलला. पालक, मेथी, शेपू, कोबी, फ्लॉवर, शेवगा, टोमॅटो, कोथिंबीर अशा सेंद्रिय पद्धतीने व स्वकष्टाने पिकवलेला भाजीपाला आहारातून घेताना विद्यार्थ्यांना स्वकष्ट व स्वनिर्मितीच्या आनंदाला उधाण आले. या परसबागेमुळे ताज्या भाजीपाल्याचे महत्त्व, कुपोषण दूर करण्यास मदत झाली. मुलांची निसर्गाशी जवळीक वाढली व त्यांना बागकामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

### ४) औषधी वनस्पती :

''हिताहितं सुखंदुःखं आयुः तस्य हिताहितं।

मानं च तच्च यत्रोक्त आयुर्वेदः स उच्चते।।''

आपल्या भारतीय संस्कृतीतील आयुर्वेदाचे महत्त्व जगाला कळले आहे. आपल्यालाही काळाच्या ओघात विसरलेल्या आजीबाईंच्या बटव्याची आठवण झाली. तो औषधी वनस्पतींचा ठेवा आमच्या परसबागेत जपून त्याचा दैनंदिन जीवनात उपयोग करीत आहोत.

### वनस्पतींची यादी :

फणस, गुडमार, अन्नपूर्णा, अडुळसा, शतावरी, रानजाई, अनंता, जॅटरोपा, विक्स, कापूर, कृष्ण

तुळस, कोरफड, सोनचाफा, कदंब, ओवा, जांभूळ, हादगा, गवती चहा, पारिजातक, रातराणी, गोकर्ण, बकुळ, बहावा, लिंबू, बेल, गुळवेल, आंबा, वाघाटी, नारळ, शेवगा आणि फुलझाडे लावली आहेत.

**प्रत्येक झाडाचे महत्त्व :**

१) **फणस :** फणसाचे उत्पादन कोकणात अधिक होते. फणसाचे झाड डेरेदार असते. कच्च्या फणसापासून भाजी, तळलेले गरे बनवतात. फणस पिकला की त्यापासून फणस पोळी, बर्फी, वेफर्स, सांदण इत्यादी पदार्थ बनवले जातात.

२) **गुडमार :** याचा डायबिटिज या आजारावर उपचारासाठी उपयोग होतो. कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहण्यासाठी याच्या पानांचा वापर करतात. उष्णकटिबंधीय जंगलात या वनस्पतीची वाढ होते. याची पाने छोटी असतात. ही वनस्पती वेलवर्गीय स्वरूपात मोडते.

३) **अन्नपूर्णा :** यातील रासायनिक द्रव्यामुळे सुगंध येतो. खाद्यपदार्थांत वापर होतो. या पानांमध्ये अनेक पौष्टिकमूल्य असल्यामुळे याची पाने वेदना, तापाची लक्षणे कमी करण्यासाठी वापरली जातात. त्याचप्रमाणे बद्धकोष्ठता आणि त्वचेसाठी आयुर्वेदिक औषधांमध्ये याचा वापर केला जातो.

४) **रानजाई :** ही वनस्पती व फुले अनेक फुलपाखरे व कीटकांचे निवासस्थान असल्याने निसर्ग साखळीत या वनस्पतीला महत्त्वाचे स्थान आहे. याला आकर्षक, मनमोहक सुगंधी फुले लागतात. फुले झुबक्याने उमलतात. ही वनस्पती फुले, अनेक फुलपाखरे व कीटकांचे निवासस्थान असल्याने निसर्गसाखळीत या वनस्पतीला महत्त्वाचे स्थान आहे. अनेक आयुर्वेदिक औषधांमध्ये ही यांचा वापर केला जातो. सुवासिके व अगरबत्ती निर्मितीसाठी सुद्धा फुले वापरतात.

५) **तुळस :** कृष्ण, विक्स, कापूर हे तुळसीचे प्रकार आहेत. सर्दी, ताप, खोकला झाला असल्यास याची पाने, देठ, मंजिरीचा काढा करून प्यायला तर आराम मिळतो. कापूर तुळशीचे पान खाल्ले तर घशात थंड वाटते. दररोज एक पान चघळले तरी चालते. तुळस पुदिनावर्गीय आहे. सुंगधी वनस्पती आहे. ही एक बहुमुखी औषधी वनस्पतीदेखील आहे. ज्याचा वापर विविध स्वरूपात केला जातो. तुळशीच्या सर्व भागांचा वापर केला जातो. तुळशीला अष्टपैलू वनस्पती म्हणतात.

६) **अडुळसा :** सामान्यतः दमा, सर्दी आणि खोकला यासारख्या श्वसन समस्यासाठी वापरला जातो मात्र ही वन औषधी आरोग्याच्या अनेक समस्या दूर करण्यासाठी उपयोगी आहे. अडुळसा याचा

वापर आयुर्वेद औषधोपचारामध्ये केला जातो. याची पाने, फुले, मुळे आणि खोड यांचा उपयोग केला जातो.

७) **शतावरी :** शतावरीच्या मुळ्या शक्तिवर्धक आहेत. विशेषतः स्तनदा मातांचे दूध वाढवण्यासाठी याचा उपयोग चांगला होतो. बाळंतपणानंतर अशक्तपणा भरून काढण्यासाठी, शक्ती वाढविण्यासाठी शतावरी गुणकारी आहे.

८) **जांभूळ :** सदाहरीत सपुष्प वृक्ष असून उन्हाळ्यात फळे लागतात. जांभळ्या रंगाची व तुरट असतात. जिभेला जांभळा रंग येतो. याचे लाकूड टणक, टिकाऊ असून पाण्यात कुजत नाही. मधुमेहामध्ये जांभळाचा फायदा होतो. जांभळात पोटॅशियम मुबलक असते. रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी जांभळांचा उपयोग केला जातो. जांभळात कॅल्शियम, पोटॅशियम, लोह आणि जीवनसत्त्वे असतात.

९) **गोकर्ण :** गोकर्ण ही भारतात उगवणारी औषधी वनस्पती आहे. याची फुले गायीच्या कानासारखी निळी असतात. याला 'सराटा' किंवा 'काटे गोखरू' सुद्धा म्हणतात. उष्ण प्रदेशात गोकर्ण उगवते. ही वनस्पती सरपटत वाढणारी आहे.

१०) **बकुळ :** या वृक्षाची फुले सुगंधी असतात. उष्ण प्रदेशात बकुळ वाढतो. सावली व सुगंधी फुलांमुळे बागांमध्ये शोभिवंत वृक्ष म्हणून हा लावला जातो. ही फुले झुबक्याने येतात. पिकलेली फळे मऊ व आंबट असतात. खोडाच्या सालींचा काढा करून गुळण्या करतात. फुलांपासून मिळणारा सुगंधी पदार्थ अत्तर, तेल यांत वापरतात. हिरड्या व दातांसाठी पेस्ट बनवतात.

११) **बहावा :** हा सुंदर वृक्ष आहे. याच्या फुलांचा रंग पिवळाधम्मक असतो. दंडगोलाकार, लांबलचक शेंगेतला गाभूळलेला चिंचेसारखा गर माकडे, कोल्हे, अस्वले व पोपट आवडीने खातात. याचे लाकूड इमारतीला वापरतात. शेंगेतला गर औषधासाठी वापरतात. काविळीसारख्या आजारात याच्या बिया वापरतात.

१२) **लिंबू :** हे झाड सदाहरित असते. लिंबू सरबत, लोणचे तसेच इतर पदार्थांना चव येण्यासाठी, तसेच अंघोळीच्या पाण्यातही लिंबाचा रस घालतात. ब्लड कॅन्सरच्या उपचारांत लिंबाच्या सालींचा वापर होतो. अशक्तपणा आल्यास लिंबूपाणी घेतात. हे काटेरी झुडूपवर्गीय झाड असून याचे लिंबू, रसना लिंबू, इडलिंबू असे प्रकार आहेत.

**१३) बेल :** बेल हा 'एगल' प्रजातीतील एकमेव जातीचा वृक्ष आहे. बेलाचा वृक्ष उंचच उंच वाढतो. जंगलात हा नैसर्गिकरीत्या वाढतो. डोळ्यांचे विकार, ताप, श्वसनमार्गाला सूज येणे आणि शरीरावरच्या जखमांवरील उपचारांत बेलाच्या पानांचे गरम पोटीस बांधतात. पानांचा ताजा रस मधाबरोबर घेतात. त्रिदलपत्र हे या वृक्षाचे वैशिष्ट आहे. याचे फळ खाण्यायोग्य असते. रक्तदाब, अस्थमा, पोटाचे विकार, अल्सर, पायांतील पेटके, ताप, मूळव्याध, अतिसार अशा आजारांमध्ये उपचारांसाठी बेलाची पाने, फळे व काढा वापरला जातो.

**१४) आंबा :** आंब्याच्या झाडाच्या पानांचा वापर शुभकार्यात आवर्जून केला जातो. याची पाने कोवळी असताना केशरी व गुलाबी दिसतात, तर मोठी झाल्यावर हिरवी होतात आंब्याच्या मोहोराचा सुगंध खूप सुखद असतो. आंब्याच्या अनेक जाती आहेत. आंब्यात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्व व फायबर असते, तसेच रोगप्रतिकारक शक्तीही आंब्यात असते. कैरीपासून सार, लोणचे व मुरंबा बनवतात, तसेच पिकलेल्या आंब्यापासून आमरस व आंबामावाही बनवतात.

**१५) अनंत :** गंधराज ही भारतात उगवणारी एक वनस्पती आहे. या झाडाला अनेक पाकळ्या असलेली पांढरी फुले येतात. हे झाड कायम हिरवे असते. फुलाचा सुगंध सतत दरवळत असतो.

**१६) वाघाटी :** ही एक रानभाजी आहे. याचा वेल काटेरी असून, फुले गुलाबी रंगाची असतात. श्वास घेताना छाती व पोटात जळजळणे, डोके आणि चेहऱ्यावरील चेतापेशींत तीव्र वेदना होणे, अनेक विषाणूजन्य आजार याबरोबरच अनेक प्रजातींच्या कृमींचा नाश होण्यासाठी वाघाटीची फळे, पाने व मुळे यांचा वापर केला जातो. आयुर्वेदिकदृष्ट्या हा वृक्ष महत्त्वाचा आहे, पण फुलपाखरांच्या जीवनचक्रातही वाघाटी महत्त्वाची आहेत.

**१७) गुळवेल :** गुळवेलीच्या अनोख्या गुणांमुळे आयुर्वेदिक औषधांमध्ये या वनस्पतीचा उपयोग करतात. अशक्तपणा, कावीळ, कृमींचा त्रास, जुलाब, पोटातील मुरडा, मधुमेह, मूळव्याध, संधिवात, हगवण अशा निरनिराळ्या व्याधींमध्ये गुळवेलीचा उपयोग होतो.

### मार्गदर्शन व प्रेरणा :

'डॉक्युमेंटेशन ऑफ बेस्ट प्रॅक्टीस इन मॉडेल स्कूल्स', याअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यामंदिर शिवनाकवाडी, ता. शिरोळ या आदर्श शाळेची निवड करण्यात आली. या उपक्रमासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूरचे प्राचार्य, जिल्हा नोडल अधिकारी, यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या

उपक्रमांतर्गत करावयाच्या कार्यवाहीसाठी कोल्हापूर जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथ.), तसेच तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सदर डॉक्युमेंटेशन करत असताना शाळेचे मुख्याध्यापक व शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.


**श्रीम. विद्या पोळ,**

**श्री. मदनकुमार कांबळे,**

**श्रीम. सविता खोत,**

आदर्श मॉडेल स्कूल विद्यामंदिर,

शिवनाकवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

# वृक्ष संस्काराची नवी वाट

महाराष्ट्राच्या पूर्वेला अतिशय दुर्गम व नक्षलग्रस्त म्हणून परिचित असणारा गोंदिया जिल्हा. हिरवाईने नटलेल्या निसर्गरम्य अशा जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक आदर्श शाळा, सावली पंचायत समिती–देवरी या शाळेला खऱ्या अर्थाने मायेची हिरवी सावली देणारा सुंदर निसर्ग लाभलेला आहे.

शाळेच्या प्रवेशद्वारातून आत प्रवेश करताच आपण कुठल्या तरी रिसॉर्टमध्ये आल्याची अनुभूती आपल्याला मिळते. रस्त्याच्या दुतर्फा असणारी अशोकाची झाडे, विविध प्रकारची शोभेची झाडे, देशी–विदेशी झाडांनी शालेय परिसराला सुशोभित केलेल्या रंगरंगोटीमुळे सोबतच शालेय वर्गखोल्या, सुसज्ज मुख्याध्यापक कार्यालय, वाचनकुटी, हॅन्डवाश स्टेशन, भोजन शेड, सायकल स्टॅन्ड व 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक मंच' यामुळे शाळेच्या सौंदर्यात आणखीनच भर पडली आहे. विशेषतः शालेय आकर्षणाचा केंद्रबिंदू असणाऱ्या व लोकसहभागातून पोषणशक्ती योजनेअंतर्गत परिश्रमपूर्वक निर्माण केलेल्या परसबागेने शाळेचे आकर्षण वाढवलेले आहे.

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत सावली शाळेत परसबाग निर्माण करताना विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनवणे. स्वनिर्मितीचा आनंद देणे. मेहनत, जिद्द, कष्ट करण्याची सवय व नीतिमूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे. सौंदर्यदृष्टी वाढीस लावणे. सकस आहार मिळवणे. रासायनिक खतांचे तोटे व सेंद्रिय खतांचे फायदे विद्यार्थ्यांना समजून देणे, या उद्दिष्टांचा विचार करण्यात आला.

शाळा सुरू झाल्यापासून गावचे माजी सरपंच यांनी स्वतःच्या ट्रॅक्टरने परसबागेसाठी जमीन नांगरून दिली. त्यानंतर माजी विद्यार्थी संघातील विद्यार्थी व बचतगटाच्या सहकार्याने त्यांतील तण व कचरा काढण्यात आला. परसबागेसाठी गावातल्या तलावातून चार ट्रॉली माती आणून पसरविण्यात आली. गट्टू लावून वाफ्यांची विभागणी करण्यात आली. गावकऱ्यांचे श्रमदान व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सर्व शिक्षकांच्या अथक परिश्रमांतून शाळेची ही सुंदर अशी परसबाग फुलवली गेली. परसबागेसाठी पाण्याची उत्तम सुविधा आहे. पाइपद्वारे सोबतच अतिरिक्त पाण्याचे नियोजन करून संपूर्ण परसबागेला मुबलक पाण्याचा पुरवठा होतो. संपूर्ण परसबागेला सेंद्रिय खत दिले जाते. सेंद्रिय खताची निर्मिती शालेय परसबागेच्या एका बाजूच्या कोपऱ्यात शेण, ओल्या व सुक्या पालापाचोळ्याद्वारे कंपोस्ट खताची निर्मिती करण्यात येते व तेच खत संपूर्ण परसबागेला पुरवून सेंद्रिय खताद्वारे आरोग्यदायी भाजीपाला पिकविण्यात येतो. सोबतच विद्यार्थ्यांना रासायनिक खतांचे दुष्परिणाम सांगण्यात येतात. पाऊस पडू लागताच परसबागेत भेंडी, गवार, वांगी, चवळी, कारली, दोडके, दुधीभोपळा, काकडी, मिरची, टोमॅटो इत्यादी भाजीपाला बी–बियाणांची लावणी करण्यात आली.

रोप अंकुरल्यानंतर त्यांना आळी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी त्या रोपांची निगा राखून, वेळोवेळी पाणी देऊन त्यांची जोपासना केली. वेलांच्या झाडांना काठीचा आधार देण्यात आला. जमिनीत पारी तयार करणे, बियांची लागवड करणे इत्यादी कामांमध्ये पालकांनी विद्यार्थ्यांसमवेत उत्तम योगदान दिले. पावसाळा संपू लागताच काही विद्यार्थ्यांच्या पालकांनी श्रमदान करून वाफे तयार करून दिले. त्यात मेथी, कोथिंबीर, लाल माठ, पालक इत्यादी बी–बियाणांची लागवड करण्यात आली. काही वाफ्यांमध्ये कांदे व काही वाफ्यांमध्ये लसूण पाकळ्यांची रोवणी करण्यात आली. त्यानंतर या सुंदर अशा परसबागेची एकूणच लागवड झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या शालेय मंत्रिमंडळाने इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी गटनिहाय परसबागेच्या संवर्धनाचे म्हणजेच तण व कचरा काढणे, आळी करणे, पाणी देणे अशा कामांचे वाटप केले.

काही दिवसांनी वाफ्यांतील मेथी, कोथिंबीर, लोहयुक्त पालक, लालमाठ यांचे उत्पादन मिळू लागले, पालेभाज्यांचा वापर शालेय पोषण आहारात करण्यात येऊ लागला. वांगी, मिरची, भेंडी, टोमॅटो इत्यादींचे उत्पादन मिळू लागले. त्यांचाही समावेश शालेय पोषण आहारात करण्यात येऊ लागला. सोबतच परसबागेत जांभूळ, करवंद, पेरू या झाडांची लागवड करण्यात आली. सध्या ही फळ झाडे लहान आहेत; परंतु केळीची झाडे मोठ्या प्रमाणात उत्पादन देऊ लागली आहेत. सोबतच आवळा व नारळाची झाडेही परसबागेत लावण्यात आली असून, ही झाडे परसबागेत प्रसन्न मुद्रेने उभी आहेत. सावली शाळेतील परसबागेमध्ये विविध प्रकारच्या फळभाज्या, पालेभाज्या घेतल्या जातात. ज्याद्वारे विद्यार्थ्यांना सकस पोषण आहार मिळतो.

जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या उपस्थितीत शाळेत दि. ५ ते ८ फेब्रुवारी, २०२५ दरम्यान 'सावली महोत्सव' साजरा केला. या महोत्सवामध्ये 'खरी कमाई' हा उपक्रमही राबविण्यात आला; ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी पिकविलेला भाजीपाला विक्रीसाठी मांडण्यात आला. त्यातून विद्यार्थ्यांनी 'खऱ्या कमाई' चा आनंद घेतला. तसेच 'रक्षाबंधन' या सणानिमित्त विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून हा कार्यक्रम खूप छान साजरा केला. रक्षाबंधनला बागेतील झाडांनाही राख्या बांधून या झाडांचे संरक्षण करण्याची जबाबदारी घेतली गेली. तसेच होळीनिमित्त परिसरातील तसेच परसबागेतील सर्व कचरा जाळून होळी साजरी करण्यात आली.

पर्यावरणाविषयीची आवड निर्माण करण्यासाठी 'जल हेच जीवन, वृक्ष माझा मित्र' यासारख्या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. सोबतच विविध प्रकारचा भाजीपाला व पिके, त्यांचे आहारातील महत्त्व, त्यांच्यातून मिळणारी जीवनसत्त्वे इत्यादी विषयीची माहिती गोळा करण्याचा प्रकल्पसुद्धा घेण्यात आला. सावली महोत्सवामध्ये शाळेतील ज्या विद्यार्थ्यांनी परसबागेतील झाडांची व्यवस्थित निगा राखली

असेल, झाडांची काळजी ज्यांनी व्यवस्थित घेतली असेल, अशा विद्यार्थ्यांना 'परसबाग मित्र' हा पुरस्कार देण्यात आला.

अशा प्रकारे जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक आदर्श शाळा, सावली येथे परसबागेच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारणे, पर्यावरणाचे संरक्षण, सेंद्रिय खताद्वारे आरोग्यदायी भाजीपाला पिकवणे, विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनवणे, कष्टाचे महत्त्व, रासायनिक खते टाळणे, इत्यादी जीवनमूल्यांची रुजवणूक करीत सक्षम व पर्यावरणप्रेमी व आत्मनिर्भर विद्यार्थी तयार करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

बरेच विद्यार्थी पालेभाज्या खाण्यास ना पसंती दर्शवत असल्याचे जाणवल्याने वेळोवेळी विद्यार्थ्यांना परसबागेत नेऊन फळभाज्या व पालेभाज्यांचे महत्त्व सांगून मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे विद्यार्थी घरच्या परसबागेतही कुटुंबीयांना मदत करू लागले आहेत. ताज्या व सेंद्रिय खतांद्वारे पिकवलेल्या भाजीपाल्याचे महत्त्व जाणून घेऊन घरच्या परसबागेत त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

परसबागेला गोंदिया डायटचे प्राचार्य, वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा परिषद गोंदिया, पंचायत समिती देवरी येथील अधिकारी व पदाधिकारी यांनी भेटी दिल्या. परसबागेत गावच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते रोपांची लागवड करण्यात आली, विद्यार्थी 'माझा वाढदिवस, माझे सामाजिक दायित्व' या उपक्रमांतर्गत स्वतःच्या वाढदिवशी परसबागेत एक झाड लावतात व त्याचीच जोपासना करतात. अशा प्रकारे सामाजिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारी, वृक्षप्रेम, वृक्षसंवर्धन व जागतिक तापमान वाढ रोखण्याच्या दृष्टीने 'फूल ना फुलाची पाकळी' या उक्तीप्रमाणे या शाळेचे चिमुकले विद्यार्थी प्रयत्न करत आहेत.

डॉ. जगदीश चंद्र बोस यांनी म्हटले होते, की ''वनस्पतींनाही भावना असतात; मग त्या चिमुकल्या रोपट्यापासून ते उंचच उंच झाडापर्यंत सर्वांच्या भावना जपणे, जोपासना करणे व त्यासाठी विद्यार्थिदशेतच सुरुवात करणे.'' याकरिता हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे. परसबाग फुलवणे, ज्यातून निसर्गप्रेमी, पर्यावरणप्रेमी, मेहनती, कृतज्ञ व आत्मनिर्भर व्यक्ती बनवण्यासाठी परसबाग अत्यंत मोलाची भूमिका पार पाडते, यात शंकाच नाही. हे कार्य आमची सावलीची शाळा अविरतपणे पार पाडत आहे आणि या पुढेही पार पाडत राहीलच.

**श्रीम. वर्षा वालदे,**

जिल्हा परिषद, वरिष्ठ प्राथमिक आदर्श शाळा,

सावली पंचायत समिती, देवरी, जि. गोंदिया.

◈◈◈

# नव्या बदलाच्या दिशेने

**प्रस्तावना :**

भाज्यांचे स्थान आपल्या जीवनात विशेषतः शाकाहारी लोकांच्या आहारात अत्यंत महत्त्वाचे आहे. भाज्या या पोषणमूल्ययुक्त समतोल आहाराच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. आहारतज्ज्ञांच्या मताप्रमाणे, एका व्यक्तीला आहारात समतोलपणा राखण्यासाठी दररोज ८५ ग्रॅम फळे व ३०० ग्रॅम भाज्यांचे सेवन करणे आवश्यक असते. परंतु आपल्या देशातील भाज्यांच्या उत्पन्नाच्या पातळीप्रमाणे माणसे रोज फक्त १२० ग्रॅम भाज्याच खातात. मग भाज्यांचे महत्त्व लक्षात घेऊन उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर करून शालेय आवारातील जागेत परसबागनिर्मिती करण्याची कल्पना सुचली.

शाळेत सेंद्रिय पद्धतीने परसबाग व आहाराची बाग सुरू करण्यासाठीचा उपक्रम सुरू झाला. याला विविध शाळांतून उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यात आमच्या शाळेला महाराष्ट्रातून प्रथम येण्याचा मान मिळाला. विद्यार्थ्यांनी पिकवलेला भाजीपाला, फळे शालेय पोषण आहारात समाविष्ट करून विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक निर्माण व्हावी, त्यांना पोषक आहार मिळावा, कुपोषण दूर व्हावे असे चांगले हेतू या उपक्रमाचे आहेत. त्यासाठी शालेय आवारातील मोकळ्या जागेचा वापर करण्याची संधी उपलब्ध झाली. मग शिक्षकांना स्वखर्चातून परसबागनिर्मिती करण्याची संकल्पना सुचली व या शालेय परिसरात उपलब्ध बी-बियाणांचा व रोपांचा वापर करून परसबागेची निर्मिती केली.



शाळेतील सर्व शिक्षकांची सहविचार सभा घेऊन मुख्याध्यापकांच्या मदतीने जागेची प्रत्यक्ष पाहणी करून, शाळेतील उपलब्ध आणि योग्य पाण्याची सोय बघून सुरक्षितता व लक्ष ठेवता येईल, अशा जागेची निवड करण्यात आली. परसबाग तयार करण्याचा हेतू शालेय पोषण आहारात वापरता येईल व आपल्या रोजच्या आहारात आवश्यक असलेला भाजीपाला पिकवणे, हे उद्दिष्ट समोर ठेवून परसबाग तयार करण्याची संकल्पना साकारण्याचे ठरले. या वेळी कमीत कमी जागेत जास्तीत जास्त प्रकारचा भाजीपाला कसा घेता येईल, याचा विचार करून जागेची निवड करण्यात आली. हे नियोजन करताना शाळेतील पटसंख्येचा विचार करून व विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन, त्यानुसार भाजीपाला व पिकांची निवड करण्यात आली.

परसबागेसाठी जमिनीची निवड केल्यानंतर शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी स्वखर्चातून ट्रॅक्टरच्या साहाय्याने जागेची मशागत करून दिली. त्यानंतर सर्वांत आधी कुदळ व फावड्याच्या साहाय्याने ३० ते ४० सेंटिमीटर खोलवर खोदून त्यांतील दगडगोटे व लहान अनावश्यक असलेली रोपटी काढून टाकण्यात आली. त्यात विद्यार्थी, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचा समावेशही होता. त्यानंतर रोप लागवडीसाठी ४० ते ४५ सेंटीमीटर गरजेप्रमाणे वाफे आणि रांगा तयार करून घेण्यात आल्या. शिक्षकांच्या स्वखर्चातून परसबागेसाठी तारेचे कुंपण करण्यात आले. इयत्ता चौथी ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांकडून परसबागेची वेगवेगळ्या प्रकारच्या कामांची वाटणी करून घेण्यात आली. यासाठी साहित्याची उपलब्धता ग्रामस्थांनी व पालकांनी करून दिली.



प्रथम सेंद्रिय खतांचा वापर करून जमिनीची मशागत करण्यात आली. कोणत्या जागेत बी–बियाणे लावायचे आणि रोपांची लागवड कोणत्या जागेत करायची, याचे नियोजन करण्यात आले. काही बी–बियाणे बाजारातून तर काही रोपे रोपवाटिकेतून उपलब्ध करून घेण्यात आली. भाजीपाल्याची लागवड करताना त्यात चार ते सहा इंच जमिनीची खोली पुरेशी होती. वांगी, लसूण, कांदे, कोबी, मिरची व पालक, मेथी, कोथंबीर अशा पालेभाज्यांची लागवड करताना बियाणे किंवा देठांची लागवड केली तरी चालते. विशिष्ट अंतर सोडून बी लावून त्यावर कडुलिंबाचा पाला पसरवला, तर मुंग्यांपासून बीचे संरक्षण होते. अशा पद्धतीने लागवड करण्यात आली. एकदा बी अंकुरले की, त्याला पालवी फुटते. वीस ते पंचवीस दिवसांत नवीन फुटवा येतो व महिन्याभरात आपल्याला भाजीपाला खायला मिळतो. परसबागेत टोमॅटो, वांगी, मिरची, कांदे, पत्ता कोबी, फ्लॉवर, कोथिंबीर, मेथी, भेंडी व पुदिना इत्यादी भाज्यांची लागवड करण्यात आली. एक महिना या परसबागेत योग्य पद्धतीने सेंद्रिय खत आणि पाणी देऊन काळजी घेण्यात आली. एक ते दीड महिन्यात या परसबागेतून पालक, मेथी, पुदिना, वांगी, टोमॅटो, कांदे, मुळा, कोथिंबीर इत्यादी भाजीपाला काढण्यात आला. त्याचा उपयोग मध्यान्ह भोजनामध्ये समाविष्ट करण्यात आला; ज्यामुळे विद्यार्थ्यांना स्वनिर्मितीचा आनंद तसेच स्वतः कमावलेल्या भाज्यांची आवड निर्माण झाली. शेतीसाठी प्रेम व जिव्हाळा निर्माण झाला. विद्यार्थी आनंदाने परसबागेत काम करू लागले. कार्यानुभवच्या तासिकेला व जेवणाच्या सुट्टीत विद्यार्थी परसबागेची देखभाल करू लागले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रममूल्ये हे राष्ट्रीय मूल्ये जोपासली गेली.

परसबागनिर्मितीमध्ये तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनातून आम्हाला

परसबागनिर्मितीची प्रेरणा मिळाली. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, सहशिक्षिका यांनी प्रत्यक्ष परसबाग फुलवली व त्यावरून उत्पादन घेऊन शाळेच्या आहारात भर घातली. मुलांच्या सर्वांगीण विकासात हातभार लावला. याशिवाय आमच्या शाळेतील स्वयंपाकीण ताई, मदतनीस यांनीही खारीचा वाटा उचलून सहकार्य केले.

सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षातील परसबागेची डिसेंबर, २०२४ रोजी प्रत्यक्ष सुरुवात करून एक महिन्यानंतर विविध फळभाज्यांसह ती मुलांना पोषण आहार देण्यास योग्य झाली. त्यामुळे मुलांमधील उपस्थितीचे प्रमाणही वाढले. कल्पकता आणि सृजनशीलतेला वाव मिळाला. कृती व पर्यावरण जोपासण्याची आवड निर्माण झाली. भाजीपाल्यासोबतच फुलझाडे, फळझाडे लावल्याने शाळेचे सौंदर्य अधिकच फुलले. पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. हे केवळ शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती आणि विद्यार्थी यांच्यामुळे घडून आले.

**श्रीम. जयवंती चौधरी,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत,
जि. प. उच्च प्राथमिक आदर्श शाळा, पुनर्वसन क्र. ४,
ता. तळोदा, जि. नंदुरबार.

# परसबाग निर्मितीच्या दिशेने

परिसर अभ्यास किंवा सामान्य ज्ञान हा खरे तर निरीक्षणाचा विषय. जितके अधिक निरीक्षण केले जाईल व त्याच्या नोंदी घेतल्या जातील तितका विषय अधिक समजतो. शिक्षकांनी अध्यापन करण्यापेक्षा जर स्वयंअध्ययन घडवून आणले, तर ती संकल्पना कायमस्वरूपी लक्षात राहिली. या दृष्टीने अभ्यासातील संकल्पना सहजपणे स्पष्ट व्हाव्यात, विद्यार्थ्यांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे स्वतः शोधण्याचा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण व्हावा, यासाठी एखादा चांगला उपक्रम शोधण्याची गरज वाटत होती. आपल्या परिसराची जाण विद्यार्थ्यांना व्हावी, परिसरात घडणाऱ्या घटनांविषयी शास्त्रशुद्ध माहिती विद्यार्थ्यांना मिळावी, हा मूळ उद्देश मनात धरून हे शिकणे आनंददायी कसे करता येईल, याविषयी विचार करत असतानाच आदर्श शाळा जिल्हा नोडल अधिकारी यांनी भेट देऊन परसबाग निर्मितीविषयी प्रोत्साहन दिले.



शालेय परिसरात परसबाग असणे एक प्रकारे फायद्याचे व विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे. शालेय परिसरात परसबाग तयार करण्याचा प्रयत्न आमच्या शाळेने केला. शाळेसाठी परसबागेतून आम्ही ताजी आणि पौष्टिक भाजीपाला मिळवण्याचा प्रयत्न केला.

बाजारातून शाळेसाठी भाजीपाला खरेदी करण्याऐवजी स्वतःच्या शाळेच्या परसबागेतून भाजीपाला मिळवू शकतो, ज्यामुळे खर्चाची बचतही होते व आरोग्यदायी भाजीपाला शाळेला उपलब्ध होतो, तसेच वेगवेगळ्या वनस्पतींमुळे परिसरातील तापमान कमी होऊन, वातावरण अत्यंत आरोग्यदायी राहते. परसबागेत काम करण्याच्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांमध्ये शेतीची आवड निर्माण होईल. आहारविषयक जाणीव निर्माण होईल, याच अनुषंगाने आम्ही आमच्या शाळेत एक सुंदर अशी परसबाग तयार केली.

**परसबाग तयार करण्यासाठी :**

विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार, ताज्या आणि पौष्टिक भाज्या मिळतात. विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी आर्थिक बचत करणे. विद्यार्थ्यांसाठी रोज ताजा भाजीपाला उपलब्ध होतो. विद्यार्थ्यांना शारीरिकदृष्ट्या निरोगी बनवणे, नैसर्गिकरीत्या खत आणि कीटकनाशके यांचा वापर करून पर्यावरण रक्षणाची मूल्ये रुजवणे, विद्यार्थ्यांना शेती आणि पर्यावरणाचे महत्त्व याची जाणीव करून देणे. या उद्दिष्टांसाठी काम करणे.

**परसबागेचे आमचे नियोजन महत्त्वाचे आहे :**

**अ) परसबागेसाठी योग्य जागेची निवड :** परसबागेसाठी योग्य जागेची अत्यंत आवश्यकता आहे. आमची शाळा ही उंच टेकडीवर असून पूर्णपणे खडकाळ जमीन आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या झाडांची लागवड करून जगवणे म्हणजे एक आव्हान होते. सदर जागेत मातीच्या कमतरतेमुळे माती पाणी धरून ठेवत नसे, त्यामुळे झाडे जगवणे कठीण होते. आम्ही पालकांच्या मदतीने खालून शेतातील माती वाहून आणली, त्यामध्ये भाताचे तूस टाकून माती भुसभुशीत तयार करून घेतली. परसबागेला पुरेसा सूर्यप्रकाश, हवा व पाणी सहज उपलब्ध होणे आवश्यक असते. त्यादृष्टीने जागेची निवड केली.

**ब) झाडांची निवड व लागवड :** आम्ही आमच्या परसबागेमध्ये भाजीपाला, फुलझाडे, फळझाडे, औषधी वनस्पती असे गट तयार केले. भाजीपालामध्ये पालेभाज्या व फळभाज्या उपगट तयार केले, पालेभाज्यांमध्ये माठ, पालक, मुळा, फ्लॉवर यांची लागवड केली, फळभाज्यांमध्ये वांगी, टोमॅटो, मिरची दुधी, पडवळ, घेवडा, कारले, भोपळा, शेवगा यांची लागवड केली. वेलींना आधाराची गरज असते त्यासाठी सुंदर मांडव केला. औषधी वनस्पतींमध्ये तुळस, कोरफड, गवती चहा, पुदिना, अडुळसा, बेल या झाडांची लागवड केली, तसेच आंबा, केळी, चिकू, पेरू, जांभूळ, आवळा या फळझाडांची लागवड केली, फुलझाडांमध्ये गुलाब, जास्वंदी व मोगरा या झाडांची लागवड केली.

**क) सेंद्रिय खतनिर्मिती व कीड नियंत्रण :** परसबागेतील झाडांचे चांगल्या प्रकारे पोषण होण्यासाठी शालेय परिसरातील पालापाचोळा गोळा करून पर्ण विघटन (लिफ कंपोस्टर) यंत्रामार्फत कंपोस्ट खत तयार केले, तसेच कोणत्याही प्रकारच्या किडीचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून निम ऑइल व मिरची-लसूण पेस्टी साईड गाळून जास्त पाण्यात टाकून फवारणी केली. पूर्ण झाड भिजेल इतकी फवारणी केली त्यामुळे झाडाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही.

**ड) भाजी तोडणी व उपयोग :** एकदा परसबाग फुलली म्हणजे शाळेला पर्यायाने विद्यार्थ्यांना ती अनेक प्रकारे उपयोगी पडते, मुख्यतः शालेय पोषण आहार पोषक करण्यासाठी म्हणजेच त्याची पोषकता, चव वाढवण्यासाठी यातील भाज्यांचा उपयोग होतो. शेवग्याचा पाला, शेंगा, पडवळ,

घोसाळी, कारली, घेवडा, अळू, दुधीभोपळा, पालक, नवलकोल, माठ, कोबी, मुगाच्या शेंगा इ. भाज्यांचा पोषण आहारात खूप उपयोग होतो. पालक, माठ यांची भजी, अळूवड्या यांसारखे पदार्थ विद्यार्थ्यांच्या पानात वाढले गेले. परसबागेतील केळ्यांचे चिप्स बनवून विद्यार्थ्यांना एक आवश्यक जीवन कौशल्याचे धडे देण्यात आले, भविष्यात विद्यार्थी ठामपणे उभा राहिला पाहिजे हाच हेतू त्यामागे होता.



**परसबागेतून विद्यार्थ्यांचे झालेले अध्ययन :**

१) ताजी आणि पौष्टिक भाजी : रोज ताजी भाजी मिळवल्याने आरोग्यासाठी आवश्यक असणारी जीवनसत्त्वे आणि खनिजे विद्यार्थ्यांना मिळतात.

२) परसबागेतील भाजी रसायनमुक्त असल्याने ती अधिक पौष्टिक उपलब्ध झाली.

३) परसबागेतून भाजीपाला मिळवल्याने बाजारातून भाजी खरेदी करण्याची गरज कमी होते, ज्यामुळे शाळेची आर्थिक बचत होते.

४) परसबाग नैसर्गिकरीत्या मातीचे आरोग्य सुधारते आणि रासायनिक खतांचा वापर कमी केल्यामुळे, ज्यामुळे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होतो.

५) परसबागेत पाणी व्यवस्थापनासाठी योग्य उपाययोजना केल्यामुळे पाण्याची बचत करण्याचे संस्कार विद्यार्थ्यांवर होतात.

६) परसबागेत काम करणे हा एक प्रकारचा व्यायाम असतो, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक ताण कमी होतो.

७) परसबागेत मदत केल्याने विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाबद्दल जागरूकता निर्माण होते.

८) अनेक विद्यार्थी एकत्र येऊन परसबाग तयार करू शकतात, ज्यामुळे सहकार्य वृत्ती विकसित होते.

९) परसबागेतून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या अन्नाचे उत्पादन केल्याने त्यांना आत्मनिर्भर वाटू लागले.




**परसबागेची यशस्वितेसाठी मार्गदर्शन सहकार्य :**

शाळेच्या परसाबगनिर्मिती उपक्रमात शिक्षक, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक, मोठी जुई गावातील ग्रामस्थांचे सहकार्य मिळाले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख चिरनेर, टाईड संस्था टीम यांच्या मार्गदर्शनाने व सर्व शिक्षक-विद्यार्थी यांच्या सहकार्याने सुंदर अशी परसबाग तयार झाली. परसबाग कशी असावी याबाबत आमच्या केंद्रातील व तालुक्यातील शाळांना आमच्या परसबागेमुळे दिशा व मार्गदर्शन मिळत आहे.

**कौशिक ठाकूर,**
रायगड जिल्हा परिषद, आदर्श शाळा
मोठीजुई, ता. उरण, जि. रायगड.

# उपक्रमातून जीवन विकास

## प्रस्तावना

जिल्हा परिषद वरखेड शाळेच्या परसबागेतील हरितमय वातावरण विद्यार्थ्यांच्या डोळ्यांना आनंद देतो. तिथे लावलेल्या रंगीबेरंगी फुलांचे सजीव चित्र मनमोहक आहे. गुलाब, मोगरा, जास्वंद यांसारख्या फुलांच्या सुगंधाने परिसरात प्रसन्नता वाटते. परसबागेतील हरितलता आणि झाडांमुळे पर्यावरण स्वच्छ राहते. विविध प्रकारच्या वनस्पतींमुळे निसर्गाशी आपुलकी वाढते. विद्यार्थ्यांच्या खेळण्यासाठी आणि अभ्यासासाठी सुखद जागा आहे. ताजेतवाने होण्यासाठी आणि उत्साह मिळवण्यासाठी परसबागेचे महत्त्व आहे. निसर्गाशी जवळीकतेमुळे विद्यार्थ्यांचे मन आणि मेंदू ताजेतवाने राहतात. पक्ष्यांचे किलबिल आणि फुलपाखरांचे नृत्य आनंददायक आहे. परसबागेमुळे शाळेचे वातावरण आनंदी आणि शिक्षणासाठी उपयुक्त होते. मखमली गवतावर खेळताना विद्यार्थ्यांना स्फूर्ती मिळते. निसर्गाशी जवळीकतेमुळे प्रेरणा मिळते. फुलांची रचना डोळ्यांना आनंद देते. फुलपाखरांचे नृत्य पाहून आनंद होतो. परसबागेमुळे परिसरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

जिल्हा परिषद शाळेच्या परसबागेत विविध प्रकारच्या भाजीपालांची लागवड केली जाते. येथे शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक मिळून विविध प्रकारच्या भाजीपाल्याची लागवड करतात, त्यांचे संगोपन करतात. शाळेच्या परसबागेत टोमॅटो, कांदे, मिरच्या, बटाटे, गाजर, पालक, मेथी, कोथिंबीर इत्यादी सारख्या अनेक प्रकारच्या भाज्या आहेत. टोमॅटोचे लाल आणि टवटवीत रंग, मिरच्यांची हिरवी चटकदारता, बटाट्यांची घट्टता, गाजरांची केशरी चमक आणि पालकाच्या पानांचा टवटवीतपणा परिसराला सुंदर बनवतात.

शाळेतील विद्यार्थी या परसबागेत विविध भाजीपाल्यांची लागवड करून त्यांची निगराणी आणि देखभाल करतात. ते पाणी देणे, निराई करणे, खत टाकणे आणि कीटकनाशक फवारणे इत्यादी कामे नियमितपणे करतात. या कृतीमुळे विद्यार्थ्यांना शेतीच्या तंत्रज्ञानाची आणि जैविक विविधतेची माहिती मिळते. परसबागेतील भाजीपाला विद्यार्थ्यांना आरोग्यदायक आणि ताजे अन्न मिळवून देतो. यामुळे विद्यार्थ्यांचे पोषण आणि आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे. त्यांनी पिकवलेला भाजीपाला शाळेच्या मध्यान्ह भोजनात वापरला जातो, ज्यामुळे स्वच्छता आणि पोषणाचे महत्त्व वाढते.

## अशी निर्मिली परसबाग :

१) **योजना तयार करणे :** प्रारंभात शाळेच्या परसबागेच्या उपक्रमाची विस्तृत योजना तयार करणे. यात लागवड, देखभाल आणि अन्य क्रियाकलापांचा समावेश असावा.

२) **सहभागींची निवड :** विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी विशेष गटांची निवड करणे. हे गट विविध कार्यांसाठी जसे की पाणी देणे, निराई करणे, खत तयार करणे इत्यादीसाठी जबाबदार असावेत.

३) **साहित्याची सोय :** लागवडीसाठी आवश्यक साहित्य, बी–बीयाणे, खत, पाण्याची व्यवस्था आणि शेतीचे उपकरणे उपलब्ध करून देणे.



४) **प्रशिक्षण :** विद्यार्थ्यांना शेती तंत्रज्ञान आणि पद्धती शिकविण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे. त्यांना जैविक शेती, कीटकनाशकांचा वापर आणि स्वच्छतेचे महत्त्व शिकवणे.

५) **लागवड आणि देखभाल :** परसबागेत विविध भाज्यांचे, फळांचे, आणि फुलांचे लागवड करणे. नियमित पाणी देणे, निराई करणे आणि खत टाकणे या कामांवर लक्ष ठेवणे.

६) **वृक्षारोपण आणि देखभाल :** शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करणे आणि त्यांच्या देखभालीसाठी विशेष गटाची जबाबदारी देणे.

७) **स्वच्छता मोहीम :** परसबागेची स्वच्छता राखण्यासाठी नियमित मोहिमा राबवणे. विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे.

८) **जैविक खत तयार करणे :** विद्यार्थ्यांना जैविक खत तयार करण्याची पद्धती शिकवणे आणि परसबागेत त्याचा वापर करणे.

९) **कीटकनाशक फवारणी :** नैसर्गिक कीटकनाशकांचा वापर करून परसबागेचे संरक्षण करणे. विद्यार्थ्यांना सुरक्षित कीटकनाशक पद्धती शिकवणे.

१०) **उत्पादनांचे मापन :** विद्यार्थ्यांनी पिकवलेल्या भाज्यांचे उत्पादन मोजून त्यांची नोंद करणे.

११) **उत्पादनाची विक्री :** शाळेच्या बाजारात भाज्यांची विक्री करणे. यामुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास आणि व्यवसायिक कौशल्ये मिळवता येतील.

१२) **प्रयोग आणि निरीक्षण :** विविध प्रयोग करून भाजीपाला उत्पादनाच्या पद्धती सुधारण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.

१३) **पर्यावरण शिक्षण कार्यक्रम :** पर्यावरणाशी संबंधित उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व शिकवणे.

१४) **प्रोत्साहन आणि पुरस्कार :** उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे आणि पुरस्कार देऊन सन्मानित करणे.

१५) **सततचे निरीक्षण आणि पुनरावलोकन :** परसबागेतील उपक्रमांचे नियमित निरीक्षण करणे आणि आवश्यकतेनुसार सुधारणा करणे.

या टप्प्यांद्वारे जिल्हा परिषद वरखेड शाळेच्या परसबाग उपक्रमाची कार्यवाही प्रभावीपणे करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. जिल्हा परिषद वरखेड शाळेच्या परसबागेसाठी राबवलेल्या काही उपक्रमांची यादी

१) **शेती प्रशिक्षण वर्ग :** विद्यार्थ्यांना शेतीचे तंत्रज्ञान आणि विविध पद्धती शिकविण्यासाठी विशेष प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले.

२) **सांघिक लागवड उपक्रम :** विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मिळून परसबागेत विविध भाज्यांचे आणि फुलांचे लागवड करण्यात आली.

३) **वृक्षारोपण मोहीम :** शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरणाची जपणूक करण्यास प्रोत्साहन देण्यात आले.

४) **जैविक खत तयार करणे :** विद्यार्थ्यांना जैविक खत तयार करण्याची पद्धती शिकविण्यात आली आणि हे खत परसबागेत वापरण्यात आले.

५) **कीटकनाशक फवारणी कार्यशाळा :** विद्यार्थ्यांना नैसर्गिक कीटकनाशकांच्या फवारणीचे महत्त्व आणि पद्धती शिकवण्यासाठी कीटकनाशक फवारणी कार्यशाळा घेण्यात आली.

६) **हंगामी फळांची लागवड :** विद्यार्थ्यांना विविध हंगामी फळांची लागवड आणि त्यांची देखभाल शिकविण्यात आली.

७) **स्वच्छता मोहीम :** परसबागेची स्वच्छता आणि निगा राखण्याचे महत्त्व शिकवले.

८) **भाजीपाल्याची विक्री :** विद्यार्थ्यांनी पिकवलेल्या भाज्यांची शाळेच्या बाजारात विक्री केली.

९) **विभागणी उपक्रम :** प्रत्येक विद्यार्थ्याला काही झाडे किंवा वेलींची जबाबदारी देण्यात आली आणि त्यांची देखभाल करण्यात आली.

१०) **सेंद्रिय शेती मोहीम :** परसबागेत सेंद्रिय शेतीचे महत्त्व आणि त्याची पद्धती सांगितल्या.

११) **हरित तंत्रज्ञानाचा वापर :** परसबागेत सौर ऊर्जा, पाण्याची साठवण आणि पुनर्वापर यांसारख्या हरित तंत्रज्ञानांचा वापर केल्यास त्याचे फायदे विद्यार्थ्यांना सांगितले.

१२) **फळांच्या बागायतीची लागवड :** परसबागेत फळांच्या झाडांची लागवड करून फळांच्या उत्पादनास प्रोत्साहन दिले.

१३) **इको-क्लबची स्थापना :** शाळेतील विद्यार्थ्यांचा इको-क्लब स्थापन केला आणि पर्यावरण जपणुकीचे विविध उपक्रम राबवले.

१४) **शेती साहित्य प्रदर्शन :** विविध शेती साहित्यांचे प्रदर्शन आयोजित करून विद्यार्थ्यांना त्यांची माहिती दिली.

या उपक्रमांद्वारे शाळेच्या परसबागेचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले. विद्यार्थी पर्यावरणाच्या संरक्षणाबद्दल अधिक जागरूक झाली. विद्यार्थ्यांना निसर्गाशी जवळीक ठेवण्याची संधी मिळाली, त्यांना शेती, बागकाम आणि जैविक विविधतेबद्दल महत्त्वपूर्ण ज्ञान मिळाले.

या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह, स्फूर्ती वाढते आणि ते अधिक प्रेरित होतात. परसबागेतील प्रत्येक कामामध्ये सहभागी होऊन त्यांना सामूहिक कार्याचे महत्त्व आणि जबाबदारीची जाणीव होते. अशा प्रकारे, परसबागेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचा नवीन दृष्टिकोन मिळतो.



**परसबाग उपक्रमाचे फायदे :**

१) **शारीरिक आणि मानसिक आरोग्य :** परसबागेत काम केल्यामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारते.

२) **निसर्गाशी जवळीकता :** निसर्गाशी जवळीक ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व कळते आणि ते पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे शिकतात.

३) **शेती तंत्रज्ञानाचे ज्ञान :** विविध शेती तंत्रज्ञान आणि पद्धती शिकण्यास मदत होते. विद्यार्थ्यांना जैविक शेती, खत तयार करणे आणि कीटकनाशकांची माहिती मिळते.

४) **सामूहिक कामाची जाणीव :** उपक्रमांमध्ये सहभागी होऊन विद्यार्थी सामूहिक कार्याची महत्त्व शिकतात आणि एकमेकांसोबत काम करण्याची सवय लावतात.

५) **समाजाभिमुखता :** विद्यार्थी शाळेच्या बाजारात भाज्या विकून आत्मविश्वास वाढवतात आणि समाजाशी जोडले जातात.

६) **स्वच्छता आणि आरोग्य :** परसबागेत ताज्या भाज्या आणि फळांच्या उत्पादनामुळे विद्यार्थ्यांना ताजे आणि पौष्टिक अन्न मिळते, ज्यामुळे त्यांच्या आरोग्यात सुधारणा होते.

७) **पर्यावरण शिक्षण :** पर्यावरणाशी संबंधित उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व पटते.

८) **आत्मनिर्भरता :** उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आत्मनिर्भरता आणि स्वावलंबन शिकवता येते.

केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजने'अंतर्गत शाळांमध्ये परसबाग निर्माण केली. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांनी पिकवलेला भाजीपाला व फळे इत्यादी पोषण आहारात समाविष्ट करून विद्यार्थ्यांना देण्यात येतात. शाळेला परसबाग उपक्रमाचा खूप फायदा झाला आहे.

**प्रदीप जाधव,**
जिल्हा परिषद मराठी उच्च. प्राथ. शाळा वरखेड,
ता. चिखली, जि. बुलढाणा.

# जीवन शिक्षणच्या वाटेने

आमच्या शाळेत दुरून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. या मुलांच्या आहाराच्या सवयींमध्ये पोषणमूल्य युक्त आहार, विशेषतः ताज्या फळभाज्या, हिरव्या पालेभाज्यांचा समावेश तुलनेने कमी प्रमाणात आढळतो. अपुऱ्या पोषणमूल्यांमुळे काही विद्यार्थ्यांमध्ये कुपोषणाची समस्या दिसून येते. ही बाब लक्षात घेऊन, 'प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजने'अंतर्गत आमच्या शाळेच्या आवारात एक 'नावीन्यपूर्ण परसबाग' विकसित करण्याचा आम्ही निर्णय घेतला.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आमच्या शाळेतील मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांची बैठक घेतली. त्यामध्ये शाळेच्या परिसरात परसबाग उभारण्याबाबत चर्चा करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांच्या सकस आहारासाठी आणि पर्यावरण साक्षरतेसाठी या संकल्पनेचा उपयोग कसा करता येईल, यावर सविस्तर विचारविनिमय झाला. त्यानुसार, नियोजनपूर्वक कार्यवाही करून आम्ही आमच्या शाळेच्या प्रांगणात एक नावीन्यपूर्ण परसबाग साकारली.



आमच्या शाळेतील परसबाग आम्ही केवळ भाजीपाल्यापुरतीच मर्यादित न ठेवता, ती विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा आणि प्रयोगशीलतेचा एक उत्तम मंच बनली आहे.

१) **मर्यादित जागेचा प्रभावी वापर :** आमच्या परसबागेत लहानशा जागेतही अधिकाधिक भाजीपाल्याचे उत्पादन कसे घेता येईल, यावर आम्ही विशेष भर दिला आहे.

२) **शेतीविषयक ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव :** विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या भाज्या पाहण्याची, त्या भाज्यांचे लागवड तंत्र शिकण्याची व त्या भाज्यांचा प्रत्यक्ष स्वाद घेण्याची संधी मिळाली.

३) **पर्यावरणपूरक शेतीतंत्राचा अवलंब :** नैसर्गिक शेतीपद्धती, सेंद्रिय खतांचा वापर, टाकाऊ पदार्थांपासून खतनिर्मिती अशा संकल्पना प्रत्यक्ष अमलात आणल्या जात आहेत.

४) **विद्यार्थ्यांचा सकस आहार :** परसबागेतून मिळणाऱ्या ताज्या व पौष्टिक भाज्यांचा समावेश शालेय पोषण आहारामध्ये केला जातो.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कृषीविषयक मूलभूत ज्ञान निर्माण होत आहे. शेतीशी जोडलेल्या पारंपरिक तंत्रांबरोबरच नावीन्यपूर्ण प्रयोगही मुले शिकत आहेत. त्याचबरोबर, श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व, पर्यावरण

संरक्षण, स्वावलंबन आणि पौष्टिक आहाराची जाणीव या संकल्पनांचा प्रचार व प्रसार होण्यास मदत होत आहे. आमच्या शाळेची नावीन्यपूर्ण परसबाग केवळ एक शेती प्रकल्प नसून, तो विद्यार्थ्यांसाठी स्वावलंबन, आरोग्य, पर्यावरण जतन आणि शालेय पोषण आहार सुधारणा यांसाठीचा प्रेरणादायी उपक्रम ठरला आहे.

'नावीन्यपूर्ण परसबाग' हा उपक्रम यशस्वीपणे राबविताना विविध प्रकारच्या साधनांचा प्रभावी वापर करण्यात आला. परसबागेत भाजीपाला, फळभाज्या आणि औषधी वनस्पतींची लागवड करताना पुढील साधनांचा उपयोग करण्यात आला.

१) **माती आणि खत :** भाजीपाला उत्पादनासाठी सुपीक आणि सेंद्रिय खत मिसळलेली माती वापरण्यात आली.

२) **कुदळ आणि फावडे :** जमिनीची मशागत, माती उलटसुलट करून, लागवडीकरता कुदळ व फावडे वापरले.

३) **औषधी वनस्पतींची लागवड :** लागवडीसाठी कुंड्या (४० कुंड्या) मर्यादित जागेत औषधी वनस्पतींची लागवड करण्यासाठी कुंड्यांचा उपयोग केला.

४) **पाणी साठवण आणि सिंचन यंत्रणा :** झाडांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी टाक्या आणि ओलावा टिकवून ठेवण्यासाठी ठिबक सिंचन तंत्राचा वापर केला गेला.

५) **बिया आणि रोपे :** विविध प्रकारच्या भाज्या, फळभाज्या आणि औषधी वनस्पतींसाठी गुणवत्तापूर्ण बिया व रोपे उपलब्ध करून घेतली.

६) **सेंद्रिय खत आणि कंपोस्ट युनिट :** नैसर्गिक खतांच्या वापरावर भर देत टाकाऊ पदार्थांपासून कंपोस्ट खत तयार करण्यात आले.

७) **गवत कापणी व तण नियंत्रणासाठीची हत्यारे :** परसबाग स्वच्छ व व्यवस्थित ठेवण्यासाठी गवत कापण्याची आणि तण काढण्यासाठीची साधने वापरली गेली.

८) **मुलांसाठी हातमोजे आणि छोटी अवजारे :** विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभाग घेता यावा, म्हणून त्यांच्या वापरासाठी छोटी हत्यारे आणि हातमोजे उपलब्ध करून दिले.

या सर्व साधनांचा वापर करून आम्ही आमच्या शाळेच्या आवारात एक सेंद्रिय, पर्यावरणपूरक आणि शैक्षणिक दृष्टिकोन असलेली नावीन्यपूर्ण परसबाग विकसित केली.

**'नावीन्यपूर्ण परसबाग' उपक्रमाची कार्यवाही :**

जिल्हा परिषद राज्य मॉडेल स्कूल, विजयनगर येथे मुख्याध्यापक आणि शिक्षक मंडळाच्या सहकार्यामुळेच 'नावीन्यपूर्ण परसबाग' हा उपक्रम प्रत्यक्षात साकारला गेला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेती, पर्यावरण संवर्धन आणि पौष्टिक आहाराचे महत्त्व शिकविण्याचा उद्देश होता.

१) **पहिल्या टप्प्यातील कार्यवाही :**

शाळेच्या परिसरात परसबागेसाठी योग्य जागेची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी त्यांना गटांमध्ये विभागून जबाबदाऱ्या दिल्या गेल्या. परसबागेच्या मातीची सुपीकता वाढवण्यासाठी सेंद्रिय खत व कंपोस्ट खताची निर्मिती केली. निवडलेल्या जागेत भाजीपाला व औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी वाफे तयार करण्यात आले.

२) **दुसऱ्या टप्प्यांतील कार्यवाही :**

विविध पालेभाज्या (पालक, मेथी, कोथिंबीर), फळभाज्या (वांगी, मिरची, टोमॅटो) आणि औषधी वनस्पती (तुळस, गवतीचहा, अडुळसा) यांची लागवड करण्यात आली. झाडांच्या जोपासनेसाठी विद्यार्थ्यांनी ठरवीक वेळेत पाणी देणे, तण काढणे, सेंद्रिय खत वापरणे, आणि झाडांची देखभाल करणे, या जबाबदाऱ्या पार पाडल्या. झाडांची वाढ आणि उत्पादन यांचे नियमित निरीक्षण करण्यात आले आणि त्यानुसार सुधारणा करण्यात आल्या.

३) **उपक्रमाच्या तृतीय टप्प्यांतील कार्यवाही :**

विद्यार्थ्यांनी स्वतः पिकवलेल्या भाज्यांचा उपयोग शालेय पोषण आहारात करण्यात आला; ज्यामुळे आहार पोषक व ताज्या भाज्यांनी युक्त असा झाला. शाळेतील संपूर्ण शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी परसबागेतील उत्पादनाच्या व्यवस्थापनात सक्रिय सहभाग घेतला. परिसरातील पालक आणि गावातील नागरिकांना हा उपक्रम समजावून सांगण्यासाठी विशेष मार्गदर्शन शिबिरांचे आयोजनही करण्यात आले.





**उपक्रमाची यशस्विता :**

कोणताही उपक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापकांचे योग्य नियोजन, सर्व शिक्षकांची मेहनत आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असतो. 'नावीन्यपूर्ण परसबाग' हा आमचा शालेय उपक्रमही याच तत्त्वांवर आधारित होता.

१) **योग्य नियोजन व अंमलबजावणी :**

मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी परसबागेच्या नियोजनासाठी सुरुवातीपासूनच योग्य भूमिका बजावली. मर्यादित जागेचा जास्तीत जास्त उपयोग कसा करता येईल, कोणत्या प्रकारच्या भाज्या

व औषधी वनस्पती लावाव्यात, खत व्यवस्थापन कसे करावे, सिंचनासाठी कोणते तंत्र वापरावे, याचे व्यवस्थित नियोजन करण्यात आले.

**२) शिक्षकांची मेहनत व मार्गदर्शन :**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परसबागेचे महत्त्व समजावून सांगितले. सेंद्रिय शेतीचे फायदे पटवून दिले आणि लागवडीच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना मार्गदर्शन केले. भाजीपाल्याची लागवड, खत व्यवस्थापन, पाणीपुरवठा, तण नियंत्रण आणि उत्पादन यांसंबंधीचे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.

**३) विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग :**



विद्यार्थ्यांनी स्वतःच झाडे लावली आणि त्यांची निगा राखली. त्यांनी स्वतःच्या कष्टातून उत्पादन घेतलेला भाजीपाला शालेय पोषण आहारात वापरण्याचा आनंद घेतला. हा उपक्रम त्यांच्यासाठी केवळ शिक्षणाचा भाग राहिला नाही, तर त्यांना जबाबदारी, श्रमप्रतिष्ठा आणि निसर्गासोबत जोडले गेल्याचा अमूल्य अनुभव मिळाला.

**४) कमी जागेत अधिक उत्पादन :**

या उपक्रमात मर्यादित जागेत आणि मर्यादित संसाधनांचा वापर करून अधिकाधिक भाजीपाल्याचे उत्पादन घेण्यावर भर देण्यात आला. पाण्याचा कार्यक्षमतेने वापर करण्यासाठी ठिबक सिंचन पद्धती अवलंबली. अल्पकालीन व पौष्टिक भाज्यांची निवड करून जलद उत्पादन घेण्यावर भर देण्यात आला.

**५) पर्यावरणपूरक दृष्टिकोन :**

कोणतेही रासायनिक खत किंवा कीटकनाशके न वापरता सेंद्रिय पद्धतीने शेती केली गेली. पावसाच्या पाण्याचे संकलन करून ते सिंचनासाठी वापरण्यात आले. परसबागेमुळे शाळेच्या परिसराचे सौंदर्य वाढले आणि पर्यावरण संतुलनास मदत झाली.

**६) गावकऱ्यांचा सहभाग व सूचना :**

गावकऱ्यांनी शाळेच्या परसबागेला भेट देऊन त्यांच्याकडील पारंपरिक शेतीविषयक ज्ञान विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांनी उत्तम उत्पादनासाठी बियाणे निवड, सेंद्रिय खताचा वापर आणि

वाफा पद्धतीने लागवड करण्यासंदर्भात उपयुक्त सूचना केल्या; ज्यामुळे आमची परसबाग अधिक समृद्ध झाली.

७) **आरोग्यवर्धक परिणाम :**

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या आहारात ताज्या आणि सेंद्रिय भाज्यांचा समावेश झाला; ज्यामुळे कुपोषण रोखण्यास मदत झाली. मुलांना जंकफूडपेक्षाही पोषणमूल्यांनी समृद्ध अशा भाज्यांचे सेवन करण्याची सवय लावून घेतली.

८) **व्यावहारिक ज्ञान व आत्मनिर्भरतेचा पाया :** परसबाग हा केवळ शालेय उपक्रम राहिला नाही; तर विद्यार्थ्यांना कृषी शिक्षण, आत्मनिर्भरता आणि उपजीविकेच्या संधींचे महत्त्व पटवून देणारा उपक्रम ठरला.

शालेय 'नावीन्यपूर्ण परसबाग' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. शालेय शिक्षणासोबतच प्रत्यक्ष अनुभवांतून ज्ञान मिळाल्याने विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला आणि त्यांना कृषिक्षेत्राची आवड निर्माण झाली. भविष्यात, ही परसबाग अधिक विस्तृत करून ठिबक सिंचन, आधुनिक सेंद्रिय शेती तंत्र आणि अधिक प्रकारच्या औषधी वनस्पतींचा समावेश करण्याचा आमचा विचार आहे. एकंदरीतच, हा 'नावीन्यपूर्ण परसबाग' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सकारात्मक बदल घडवणारा ठरला असून, हा उपक्रम भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी आम्हाला आशा आहे.

**श्रीम. स्नेहा पाटील**

जिल्हा परिषद राज्य मॉडेल स्कूल,

विजयनगर, म्हैसाळ, ता. मिरज, जि. सांगली.

◈◈◈

# आदर्श शाळांच्या अनुषंगाने सुरू असणारे उपक्रम







09:00